आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ एप्रिल २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरु/ वक्फ मालमत्तांचं व्यवस्थापन करणं हा विधेयकाचा हेतू असल्याचं सरकारतर्फे स्पष्टिकरण, तर हेतूबद्दल विरोधकांचे विविध आरोप

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची थायलंडच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा, दोन्ही देशांमधे विविध क्षेत्रांमधल्या सहकार्यासाठी सहा सामंजस्य करार

- सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांच्या मालमत्तेची माहिती संकेतस्थळावर जाहीर होणार

- महाराष्ट्राच्या विविध भागात अवकाळी पावसाची हजेरी, येत्या दोन दिवसात चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता

**आणि**

- आयपीएलमधे आजच्या सामन्यात, प्रथम क्षेत्ररक्षण करायचा सनरायजर्स हैदराबादचा निर्णय /कोलकाता नाईट रायडर्सची खराब सुरुवात

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरू आहे. संयुक्त संसदीय समितीत सखोल चर्चा केल्यानंतरच हे विधेयक आणल्याचं अल्पसंख्यक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी विधेयक मांडताना सांगितलं. वक्फच्या मालमत्तेत मुस्लिमेतर व्यक्ती हस्तक्षेप करणार नाही, याचा लाभ केवळ मुस्लिम व्यक्तींनाच मिळेल, असं रिजीजू यांनी स्पष्ट  केलं. या विधेयकाचा हेतू वक्फ मालमत्तांचं व्यवस्थापन करणं असून मुस्लिमांच्या  धार्माचरणात हस्तक्षेप करण्याचा नाही असंही त्यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयक आणून सरकार समाजात विभाजन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेस खासदार सय्यद नासेर हुसैन यांनी केला. हे विधेयक चुकीच्या माहितीच्या आधारे बनवलं गेल्याचं हुसैन म्हणाले. संयुक्त संसदीय समितीत बहुसंख्य सदस्यांनी विधेयकाला विरोध केला होता. त्यामुळे वक्फशी संबंध नसणाऱ्या लोकांना समितीत चर्चेसाठी बोलावलं गेलं असा आरोपही त्यांनी  सरकारवर केला. हे विधेयक पसमांदा मुसलमान, महिला, गरीब यांच्या आयुष्यात क्रांतीकारी परिवर्तन आणणारं आहे, असं भाजपा खासदार राधामोहन दास अग्रवाल म्हणाले. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुस्लिमांचा विकासही महत्वाचा आहे, या विधेयकामुळे हे साध्य होईल, असं अग्रवाल म्हणाले.

या विधेयकाद्वारे एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य केलं जात असल्याचा आरोप द्रमुकचे खासदार तिरुजी शिवा यांनी केला. हे विधेयक धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाविरोधात आहे असं म्हणत शिवा यांनी विधेयकाला विरोध केला. हे विधेयक जनतेच्या मूलभूत अधिकाराविरोधात आहे असं तृणमूल काँग्रेसचे खासदार मोहम्मद नदीमुल हक म्हणाले. आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंह यांनी हे विधेयक संविधानविरोधी असल्याचं सांगत ते मागे घेण्याचं सरकारला आवाहन केलं. राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज कुमार झा यांनीही विधेयकाच्या हेतूवर शंका उपस्थित केली.

**<><><><><>**

भारतीय लोकशाहीचं सर्वसमावेशक स्वरूप दर्शवणारं राज्यसभा हे संसदेचं स्थायी सभागृह असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. आज राज्यसभा दिनानिमित्त ते सभागृहात बोलत होते…

**होल्ड - बाईट- धनखड……**

१९५२ मधे ३ एप्रिल रोजी राज्यसभा अस्तित्वात आली.

**<><><><><>**

भारताच्या सागरी हद्दीत व्यापारासाठी प्रवास करणाऱ्या जहाजांच्या नियमनाकरता मांडण्यात आलेलं तटवर्ती नौकानयन विधेयक २०२४ आज लोकसभेत मंजूर झालं. सागरी व्यापारात देशांतर्गत सहभाग वाढवण्याच्या दृष्टीनं विविध नियमांचं एकत्रीकरण या विधेयकात केलं आहे. हे विधेयक संघराज्य सहकार्याच्या संकल्पनेवर आधारित असून कोणत्याही राज्याच्या अधिकारक्षेत्रावर त्यामुळे गदा येणार नाही असं केंद्रीय बंदर आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना सांगितलं.

**<><><><>**

कोणत्याही कायद्याचा मसुदा हा त्याचा आत्मा असतो असं लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. कायद्याचा मसुदा पारदर्शक आणि सोपा असावा कारण सर्वसामान्यावर त्याचा प्रभाव दीर्घकाळ राहातो. ते आज ३६ व्या आंतरराष्ट्रीय कायदा मसुदा प्रशिक्षण कार्यक्रमात बोलत होते.

**<><><><>**

भारत आणि थायलंड यांनी आज आयटी, सागरी क्षेत्र, लघु आणि मध्यम उद्योग, हातमाग आदी क्षेत्रात सहकार्य करण्याच्या दृष्टीने सहा सामंजस्य करार केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि थायलंडचे प्रधानमंत्री पेईतोंगटार्न शिनावात्रा यांच्यात झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर हे करार झाले. दोन्ही देशातली धोरणात्मक भागीदारी बळकट करण्याचा निर्णय या चर्चेत झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. दोन्ही देशांच्या सुरक्षा यंत्रणांमधे धोरणात्मक संवाद वाढवणं, पर्यटन, संस्कृती आणि शिक्षण क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचं मोदी यांनी सांगितलं. व्यापार , गुंतवणूक वाढवण्याबाबतही दोन्ही देशात सहमती झाली. बौद्ध धर्म हा दोन्ही देशातला महत्वाचा दुआ असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. या भेटीत शिनावात्रा यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना त्रिपिटीकाची पाली भाषेतली प्रत भेट दिली. याबद्दल मोदी यांनी शिनावात्रा यांचे

आभार मानले. त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी थायलंडमधल्या बँकॉक इथे पोहोचले. विमानतळावर थायलंडचे उपप्रधानमंत्री सूर्या जुआनग्रुआंकित यांनी मोदी यांचं स्वागत केलं. सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेसाठी प्रधानमंत्री उद्या उपस्थित राहणार आहेत. या शिखर परिषदेत अनेक करार आणि घोषणा होण्याची शक्यता आहे. ही परिषद आटोपून मोदी उद्या तीन दिवसांच्या श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**<><><><><>**

न्यायव्यवस्थेवरचा जनतेचा विश्वास वाढावा तसंच त्यात पारदर्शकता यावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांनी त्यांच्या मालमत्तेची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध करून देण्यासाठी सहमती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांची बैठक १ एप्रिल रोजी झाली, या बैठकीत सर्व न्यायाधीशांनी हा निर्णय घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर याची घोषणा केली जाणार आहे. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या घरी रोकड सापडल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या अनेक भागात आज अवकाळी पाऊस झाला. **रत्नागिरीत** आज पहाटे अनेक ठिकाणी वीजांसह जोरदार पाऊस पडला. पावसामुळे आंबा-काजूसारख्या पिकांचं नुकसान झालं आहे. **भंडारा** जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या पाथरी इथं वीज पडून दोन मजुरांचा मृत्यू झाला. **बीड** जिल्ह्यात केज तालुक्यात केकाणवाडी इथं झाडावर वीज कोसळल्यामुळे शेतकरी आणि गायीचा मृत्यू झाला.

येत्या दोन दिवसात विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण, मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, सोसाट्याचा वारा विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकात्याच्या इडन गार्डन्स स्टेडियमवर, कोलकाता नाईट रायडर्स, आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात सामना सुरु आहे. सनरायजर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकाता नाईट रायडर्सच्या ७ षटकात २ बाद ६५धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

सैनिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी लष्करी आरोग्य सेवेत अत्याधुनिक साधनांचा वापर करण्यावर भर दिला पाहिजे असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत लष्कराच्या आरोग्य सेवा विभागाच्या २६१ व्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलत होते. जागतिक पातळीवर आरोग्य सेवा आता तांत्रिक बदलाच्या काळातून जात असल्याचंही ते म्हणाले. विभागानं कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर सुरु केल्याबद्दल त्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

भारताबद्दल फार पूर्वीपासून आपल्याला कुतूहल होतंच, पण आता प्रत्यक्ष भारतभेटीमुळे आपण अचंबित झालो आहोत, अशी भावना चिलीचे अध्यक्ष ग्रॅबियल बोरिक फॉन्ट यांनी आज व्यक्त केली. ते आज मुंबईत राजभवन इथे आले होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांचं स्वागत केलं. नवी दिल्ली इथे भारत आणि चिलीमध्ये ‘सामायिक आर्थिक भागीदारी करार’ झाला असून व्यापार आणि वाणिज्य याशिवाय आपला देश भारताशी कृषी उद्योग, संस्कृती, महत्वपूर्ण खनिज आणि विशेष करून चित्रपट निर्मितीमध्ये सहकार्य करण्यास उत्सुक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**//<><><><><>//**